# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २४०- २३ दिनांक : - ०१/०८/२०२३

**रात्रीच्या वेळेस चाकुचा धाक दाखवुन मारहाण करुन जबरी चोरी करणा-या चोरटयांना अटक**
**गुन्हे शाखा, कक्ष २ वसई यांची कामगीरी**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दि. २९/०६/२०२२ रोजी पहाटे पहाटे ०४.०० वाजता ते ०५.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी शबीर अहमद सिद्दिकी वय ४० वर्ष धंदा-भंगार दुकान, रा. घर नं ४६०, पथरपाडा, मालजीपाडा, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे त्यांचे घरामध्ये झोपलेले असताना अज्ञात ४ ईसमांनी त्यांचे दुकानाचे दरवाजाची कडी उघडुन घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादी यांना झोपेतुन उठवुन त्यांचेपैकी एका ईसमाने फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन ‘‘तुझ्याकडील पैसे दे’’ अशी धमकी देवून त्यांच्या उशाखाली ठेवलेला वन प्लस कंपनीचा मोबाईल आणि रोख रक्कम असा एकुण २०,६००/- रुपये रक्कमेचा ऐवज चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रं. ६४४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३९२, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये मुंबई-गुजरात महामार्गावर पायी चालणा-या एकटया व्यक्तीस हेरुन त्यास चाकुचा धाक दाखवुन मारहाण करुन त्याचेजवळील मोबाईल फोन आणि पैसे जबरीने काढुन घेण्याचे गुन्हे वारंवार घडत असल्याने सदर गुन्हयांतील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवून सदरचे गुन्हे उघडकीस आणुन अशा गुन्हयांना आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी आदेशीत केले होते.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाद्वारे सापळा रचुन आरोपीत १) अभय उर्फ बिल्ला उर्फ प्रिन्स विजेश शुक्ला, रा. बाप्पा सिताराम चाळ, रुम नं -१, बाप्पा सिताराम मंदिराचे बाजुला, तुंगारेश्वर फाटा, वसई व २) आरीफ महोम्मद सिद्दिकी रा.गणेशनगर चाळ, गल्ली नं -२,तुंगार फाटा, सातिवली,वसई पुर्व यांना ताब्यात घेण्यात घेवुन त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशीकरिता केली असता त्यांनी सातिवली गावदेवी मंदिर आणि काठीयावाडी ढाबा, तुंगारफाटा या ठिकाणांवर अंधारात उभे राहून एकटयाने पायी चालत प्रवास करणा-या व्यक्तींना हेरुन त्यांना चाकुचा धाक दाखवुन मारहाण करुन त्यांचेकडील पैसे व मोबाईल चोरी केले बाबतचे आचोळे व वालीव पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील एकुण ४ गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

तसेच नायगाव पोलिस ठाणे गुन्हा नोंद क्रं. १७७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हयातील आरोपीतांचा तपासादरम्यान गुप्त बातमिदाराकरवी मिळालेल्या माहीतीवरुन आणि मोबाईलचे तांत्रिक विश्लषणाव्दारे शोध घेवून सापळा रचुन आरोपीत जिग्नेश पोपट चित्ते रा. १६११, आदर्शनगर, सोळसुंबा, वलसाड राज्य गुजरात यास ताब्यात त्याचेकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशीकरिता केली असता असता सदर आरोपीत याने वर नमुद गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. व कलम |
| --- | --- | --- |
| १ | आचोळे पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ५३६/२०२२ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे |
| २ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ६४४/२०२२ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ३ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ५७५/२०२२ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ४ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ९१९/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ५ | नायगाव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं १७७/२०२३ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे |

जबरी चोरीचे ४ आणि उघडयावरुन चोरीचा १ असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणुन त्यांचे ताब्यातुन २,०१,०००/- रुपये किंमतीचे १५ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौ.रमेश भोसले,संजय नवले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील,चंदन मोरे,सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सायबर शाखेचे सहा.फौ.संतोष चव्हाण यांनी केली आहे.

**----000-----**